CR1978053013

क्रमांक एस. व्ही. १०६३/५९०/ स-२
पुणे, दिनाक :- ३०-५-१९७८

विषय :- नगर रचना योजनेमध्ये अतिम भूखंडाची मोजणी करणे बाबत.

# परिपत्रक

नगर रचना योजना तयार करताना योजनेत समाविष्ट असलेल्या अतिम भूखंडाची नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाने जागेवर केलेल्या सीमाकनाप्रमाणे मोजणी करणे आणि भूखंडाचे क्षेत्र काढणे ही कामे या विभागाकडून केली जातात. या सबधात असे निदर्शनास आले आहे की अंतीम भूखडाचे भूमापन करताना काही वेळा अनावश्यक माहिती नाकशात दाखविली जाते व मोजणीचे मूळ आलेख ही नगर रचना विभागाकडे सुर्पत करण्यात येतात. वरील दोन्ही गोष्टी टाळण्याच्या दृष्टीने खालील सूचना देण्यात येत आहेत.

(१) अतिम भूखडाची मोजणी करताना प्रामुख्याने भूखंडाच्या हद्दीची सीमांकनाप्रमाणे मोजणी करणे हे महत्त्वाचे काम आहे. त्या भूखडात येणारे बाधकाम पक्के अगर कच्चे अगर इतर माहिती दाखविणे विशेष महत्त्वाचे नाही. अर्थात नगर रचना योजना कायम झाल्यानतर परिरक्षणासाठी ज्यावेळी हा भाग नगर भूमापन कार्यालयाकडे सोपविण्यात येतो त्यावेळी परिरक्षणाचे काम मदत होणेसाठी पक्कया स्वरुपाचे बाधकाम नकाशात असणे आवश्यक आहे. तरी अतिम भूखंडाची मोजणी करतेवेळी भूखडाच्या हद्दीत येणारे फक्त पक्के स्वरूपाचे बाधकामच आलेखात दाखविणे जरूर आहे व कच्चे अगर तात्पुरते स्वरूपाच्या इमारती अगर झोपड्या मोजणी करून आलेखात दाखविण्याची आवश्यकता नाही. तसेच नगर रचना योजनेमध्ये रस्त्यासाठी राखून ठेवलेल्या जमिनीत पण कच्चा अगर तात्पुरता इमारती अगर झोपड्या मोजणीची आवश्यकता नाही. मात्र नगर रचना योजनेच्या लवादनी जर काही आवश्यक माहिती नकांशात दाखविणे जरूर आहे असे कळविल्यास त्यांच्या गरजेप्रमाणे मोजणी करणे आवश्यक आहे.

(२) भूखंडाची मोजणी झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मूळ आलेख अगर क्षेत्र वसलेवार बुके नगररचना योजना लवादाकडे सुपूर्त करता कामा नये. आलेखाच्या आणि वसलेवार बुकाच्या आवश्यक तेवढ्या जादा प्रती भूमापकांकडून तयार करून घेऊन त्या लवादाकडे शक्य तितक्या लवकर सुपूर्त करणेची प्रथा ठेवावी.

सही/- सु. रामकृष्ण
जमाबदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, म. राज्य, पुणे.